
२८९९
ग्रा.वा. २८९९

# अग अग म्हशी

—मेबल

२८९९
वा.वा.



मूल्य चार रुपये

ज्योत्स्ना प्रकाशन

प्रकाशक
ल. गो. परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
३० सी. खोताची वाडी
गिरगाव, मुंबई ४०० ००४

पुणे शाखा
६१७, नारायण पेठ
पुणे ४११ ०३०

© ज्योत्स्ना प्रकाशन


नविन सुधारीत आवृत्ती
मार्च १९९१

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

# अग अग म्हशी

एका गावात एक गवळी राहात होता. त्याचे नाव होते बाळकोबा. एक नंबरचा आळशी होता तो. खावे, प्यावे आणि विडी फुंकीत बसावे हा त्याचा आवडता धंदा! बाळकोबाजवळ चार म्हशी होत्या. म्हशीचे दूध विकून त्याला आपले आणि आपल्या पोरांचे पोट सहज भरता आले असते. परंतु बाळकोबाने काम करायचे मनावर घेतले तर ना?

बाळकोबाची बायको पारी बिचारी कंटाळून गेली होती. दोन पोरांना सांभाळणे, घरातले स्वयंपाकपाणी करणे, बाजारहाट करणे, शिवाय म्हशींचा शेणगोठा करणे, त्यांना धुणे, त्यांचे दूध काढणे, सा ऽ ऽ री कामे तिलाच करावी लागत. न करून सांगते कुणाला?



बाळकोबाला बाजारात पाठवावे तर सकाळी गेलेला बाळकोबा संध्याकाळी परत येई! शेणगोठा करावयाला सांगावे तर इथले शेण उचलून तिकडे टाकणे याशिवाय बाळकोबाला काहीच जमत नसे. शेवटी तिला पुन्हा शेणगोठा करावा लागे.

बाळकोबा दूध काढायला बसले की चारी म्हशी लाथा झाडायला सुरुवात करीत. दूध विकायला सांगावयाची तर सोयच नव्हती. कारण बाळकोबाला कुणीही सहज फसवीत असे. एकूण बाळकोबाला कुठलेच काम सांगता येत नसे. हं, एक काम मात्र बाळकोबा आनंदाने करायला तयार असे. ते म्हणजे म्हशी चरायला नेण्याचे! कारण म्हशी एकदा रानात सोडून दिल्या की खुशाल विडी ओढीत बसायला किंवा झाडाखाली झक्कपैकी ताणून द्यायला मिळत असे.

कामाने थकून गेलेली बाळकोबाची बायको कधी कधी वैतागून जाई, आणि मग तिचा सारा राग बाळकोबावर निघे. "मी म्हणते आयते गिळायला तुम्हांला काहीच कसे वाटत नाही? दिवसभर मी मरमर मरत्ये. थोडासुध्दा हातभार लावायची इच्छा होत नाही तुम्हांला. पहावे तेव्हा आपले बसलेयत विड्या फुंकीत! चार तोंडे पोसायची, मी एकटी तरी किती राबणार?" बाळकोबाची बायको तणतणत म्हणे.

बायको रागावली की बाळकोबाजवळ एक उपाय असे. तो 'माझेच तुला ओझे झालेय ना? हा मी चाललो.' आणि मग रागारागात बाळकोबा घराबाहेर पडे. एकदोन दिवस तो पुन्हा घरी येतच नसे. मग मात्र बायकोला काळजी वाटे. ती बाळकोबाला शोधून घरी आणी.

हा प्रकार बरेच वेळ तरी झाला होता. बिचारी पारी! काम न केले तर दोन पोरे उपाशी राहातात. बाळकोबाला बोलायची सोय नाही. कसेबसे दिवस काढीत होती ती. एकदा काय झाले, पारीची बहीण सरी

अचानक पाहुणी म्हणून आली. दोघी बहिणी एकमेकींना कडकडून भेटल्या. किती वर्षांनी भेटत होत्या त्या आज! इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यावर सरीने विचारले,

'काय ग पारे तू एवढी वाळलीस कशाने? आजारी होतीस की काय?'

कपाळावर हात मारून बाळकोबाची बायको म्हणाली, 'कसला आजार अन् कसले काय? जन्माचा आजार लागलाय माझ्या मागे, असे म्हणत तिने आपल्या संसाराची सारी हकीकत बहिणीला सांगितली.

सारे काही निमूटपणे ऐकून घेतल्यावर सरी म्हणाली, 'हात्तिच्या एवढंच ना? मी सांगते तुला युक्ती. बाळकोबा घराबाहेर निघून जाण्याची धमकी देतात ना? देऊ देत. जा म्हणावे घराबाहेर. तू त्यांना आणायला मुळीच जाऊ नकोस. पोटाला भूक लागली की येतील आपोआप घरी. कायमचे थोडंच राहणार आहेत घराबाहेर? तूच त्यांना आळशीपणाची सवय लावून ठेवलीस.' पारीला सरीचे म्हणणे पटले. तिने ठरविले, बहिणीच्या सांगण्याप्रमाणे वागावयाचे. थोड्या वेळाने बहीण निघून गेली.

दुसरा दिवस उजाडला. पहाटेच बायकोने बाळकोबाला उठवले आणि म्हणाली, 'चला उठा. शेणगोठा करा. मला बरे नाही वाटत आज.'

इतक्या पहाटे उठायचे? आणि काम करायचे? छे! बाळकोबाला ते शक्यच नव्हते. अस्सा राग आला त्याला बायकोचा! गुरगुरत तो म्हणाला, 'थांब ग! काय एवढी घाई आहे शेणगोठा करायची? अंग ठणकतेय माझे.'

'अहाऽहा! म्हणे अंग ठणकतेय! मोठे कामच करता की नाही! आयते गिळायचे आणि वर म्हणायचे अंग ठणकतेय.'

बायकोचे बोलणे ऐकताच बाळकोबा ताडकन् उठला आणि ऐटीत म्हणाला,'माझे खाणे काढतेस काय? बरे आहे. हा चाललो मी.' असे म्हणून नेहमीप्रमाणे बाळकोबा तरातरा बाहेर पडला. त्याला वाटले, बायको आपली समजूत काढील. पण बायकोला तेच पाहिजे होते. मनात म्हणाली,

'पाहू किती दिवस बाहेर राहतात ते.'

बाळकोबा घराबाहेर पडला तो थेट रानात आला. दुपार झाली. रात्रही पडली. अशा रीतीने एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तीन दिवस गेले. गावातल्या ओळखीच्या लोकांकडून अन्न मागून बाळकोबाने कसेबसे पोट भरले. पण रोज त्याला अन्न कोण देणार? आज ना उद्या बायको समजूत घालायला येईल असे त्याला वाटत होते, पण ती आलीच नाही.

आता मात्र बाळकोबाचे धाबे दणाणले. शेवटी त्याने एक युक्ती केली. बाळकोबाचा मोठा मुलगा म्हशी घेऊन रानात येऊ लागला होता. बाळकोबा रानात गेला. संध्याकाळ होताच म्हशी घराकडे परतल्या. बाळकोबाने त्यातल्या एका म्हशीचे शेपूट धरले आणि तो म्हशीच्या मागून चालू लागला. बायकोने दुरूनच पाहिले की, म्हशीच्या मागाहून बाळकोबा येताहेत.

घर जवळ येताच बाळकोबाने गाणे सुरू केले,'अग, अग म्हशी, मला कुठे नेशी? अग अग म्हशी, मला कुठे नेशी?'

बाळकोबाचे नाटक बायकोने ओळखले. बायकोला बाळकोबा म्हणाला,'अग, मी माझ्या रस्त्याने जात होतो. या म्हशीनेच मला इथे आणले.' बायको नुसती हसली. बाळकोबा मुकाट्याने घरात आला आणि त्या दिवसापासून त्याने आळस सोडून दिला.



आता बाळकोबाच्या घरात सगळेजण सारखे काम करतात. त्यांना आता सुखांचे दिवस आले आहेत. पण बाळकोबाची बायको बाळकोबाचा तो मंत्र अजून विसरली नाही.

'अग अग म्हशी, मला कुठे नेशी?'

# बजरंगबली की जय!

एक होते माकड. त्याचे नाव होते पिट्टू आणि त्याच्या बायकोचे नाव होते पिट्टी. पिट्टू आणि पिट्टी एका सर्कशीतले कलावंत होते. त्या दोघांचा सर्कशीतला खेळ लोकांना खूप आवडत असे.

भरजरी पोशाख, डोक्याला रंगीबेरंगी टोप्या, अशा थाटात सायकलवर बसून ती दोघे रिंगणात आली की लोक टाळ्यांचा कडकडाट करीत. अन् मग त्या दोघांचा सायकलवरचा खेळ सुरू होई. पिट्टू सायकलवरच्या निरनिराळ्या करामती मोठ्या ऐटीत करून दाखवी. त्याचे कसब पाहून लोक थक्क होत. पिट्टूवर प्रेक्षक तर खूष होतेच, पण सर्कशीतल्या सर्व लोकांचा तो लाडका होता.


सर्कशीत येऊन पिट्टूला दोन वर्षे झाली होती. त्यामुळे आता त्याला सर्कशीतल्या जीवनाचा कंटाळा आला होता. रोज तेच सायकलवरचे खेळ, तीच माणसे, तेच खाणेपिणे आणि तेच वातावरण! झाडावर चढायला नाही, वाकड्यातिकड्या उड्या मारायची मजा नाही, उंच उंच झाडावर चढून आंबटगोड फळे चाखायचा आनंद नाही. काऽऽही नाही! कसे करमणार पिट्टूला? या सर्कशीतून पळून कसे जावे हा विचार पिट्टूच्या मनात कित्येक दिवस घोळत होता. अन् त्याच्या सुदैवाने त्याला ती संधी अचानक मिळाली.

त्या दिवशी सर्कशीतले कार्यक्रम रंगात आले होते. प्रेक्षकांच्या टाळ्यांनी तंबू दुमदुमून गेला होता. आगीच्या वर्तुळाचा प्रयोग सुरू झाला होता. नेहमीप्रमाणे त्या माणसाने पेटलेल्या तारेच्या वर्तुळातून उडी मारताना उडी चुकली, अन् ते पेटलेले वर्तुळ दूर जाऊन पडले. जवळ असलेल्या कपड्यांनी पेट घेतला आणि हा हा म्हणता तंबूसुध्दा पेटू लागला. प्रेक्षकांत एकच गोंधळ उडाला. सगळीकडे हलकल्लोळ माजला.

पिट्टूला चांगली संधी मिळाली. गलक्याचा फायदा घेऊन पिट्टू धूम पळाला.... उड्या मारीत मारीत तो एका जंगलात येऊन पोचला. आता तो खूप थकला होता. पाय उचलण्याचे देखील त्राण त्याच्यात उरले नव्हते. एवढ्यात त्याला एक छोटेसे देऊळ दिसले. ते होते बजरंगाचे देऊळ. पिट्टू आत गेला.

बजरंगापुढे बराच प्रसाद ठेवला होता. पिट्टूला लागली होती कमालीची भूक! बजरंगाला नमस्कार करून त्याने प्रथम तो सारा प्रसाद गट्ट केला आणि बजरंगाच्या मागे जाऊन तो आरामशीरपणे बसला.

तो बजरंग म्हणजे त्या जंगलातल्या माकडांचे दैवत होते. रोज नियमाने सारी माकडे बजरंगाच्या दर्शनाला येत. त्याच्यापुढे प्रसाद ठेवून भक्तिभावाने त्याला नमस्कार करीत. नेहमीप्रमाणे ती माकडे देवळात आली. पहातात तो बजरंगापुढे प्रसाद नाही.



त्यांना वाटले, बजरंगाने प्रसन्न होऊन सारा प्रसाद खाऊन टाकला. आपापसांत ठरवून त्यांनी बजरंगापुढे आणखी बराचसा प्रसाद आणून ठेवला, आणि ती सारी माकडे हात जोडून बजरंगाला म्हणाली, "देवा बजरंगा, तुझी कृपा आमच्यावर अशीच असू दे." बजरंगाच्या मागे बसलेल्या पिट्टूला वाटले, ह्या मंडळींना फसवायला ही संधी बरी आहे.

तो लगेच पुढे आला. त्यावेळी त्याच्या अंगावर सर्कशीतला भरजरी पोशाख होता. यामुळे साऱ्या माकडांना वाटले, प्रत्यक्ष बजरंग आपल्यापुढे उभा आहे. त्या साऱ्यांनी पिट्टूला साष्टांग नमस्कार घातला. पिट्टू म्हणाला, "भक्तांनो, मी तुमच्या भक्तीवर खूष झालो आहे. आता मी या रूपातच तुमच्याबरोबर राहणार आहे. तुम्हांला रोज माझे दर्शन होईल!"

माकडांना खूप आनंद झाला. ती सारी माकडे पिट्टूच्या भजनी लागली. अशा रीतीने पिट्टू बजरंगबली झाला! सारी माकडे त्याची रोज पूजा करायची. त्याला नैवेद्य दाखवायची. बसल्या जागेवर पिट्टूला सारे व्यवस्थित मिळायचे. पोशाख उतरवून दिवसभर तो मनसोक्त हुंदडायचा, या झाडावरून त्या झाडावर उड्या मारायचा. नाना तऱ्हेचे खेळ खेळायचा आणि सकाळ झाली की पोशाख चढवून बजरंगबली बनायचा. पिट्टूचे दिवस सुखात जाऊ लागले.

त्या देवळातल्या खऱ्या बजरंगाला मात्र पिट्टूचा खूप राग आला. त्याचा भोंदूपणा पाहून बजरंग मनातल्या मनात खूप संतापला. त्याने पिट्टूची खोड मोडायचे ठरविले. उड्डाण करून तो सर्कशीच्या तंबूपाशी आला. पिट्टू बेपत्ता झाल्यामुळे दुःखी झालेली त्याची बायको एका पिंजऱ्यात रडत बसली होती. बजरंगबली तिच्याजवळ गेला आणि म्हणाला,

"पिट्टे, रडू नकोस. तुझा नवरा कुठे आहे ते मला ठाऊक आहे. चल

तुला त्याच्याकडे घेऊन जातो."


बजरंगाने पिट्टीला खांद्यावर घेतली आणि पुन्हा उड्डाण करून तो जंगलातल्या आपल्या देवळात आला. देवळात पिट्टूची पूजा चालली होती. माकडांनी पिट्टूच्या पायावर फुले वाहिली होती, त्याची धूपारती चालली होती. समोर नैवेद्याचे ताट भरून ठेवले होते. एकेक माकड पिट्टूच्या पायावर डोके ठेवीत होता.

बजरंगाने पिट्टूच्या बायकोला तेथे सोडून दिले. तिने दुरूनच आपल्या नवऱ्याला पाहिले आणि धावतच पुढे जाऊन पिटूच्या गळ्याला मिठी मारली. बायकोला पाहताच पिट्टू दचकला. जर बायकोला ओळख दिली तर आपले बिंग फुटेल आणि ही सारी माकडे आपल्याला जिवंत ठेवणार नाहीत, असा विचार करून पिट्टूने पिट्टीला लोटून दिले आणि तो म्हणाला, "राम! राम! तू कोण आहेस? आणि... मला मिठी का मारतेस?" रडत रडत पिट्टी म्हणाली, "पिट्टू, तू मला ओळखले नाहीस? मी तर तुझी बायको. त्या दिवशी सर्कसच्या तंबूला आग लागली तेव्हापासून तू बेपत्ता झालास. शेवटी सापडलास. आता नाही सोडणार तुला."

"छे! छे! छे! कोण पिट्टू? मी तर ब्रह्मचारी बजरंग.... मला बायको कशी असणार? मी तुला मुळीच ओळखत नाही."

"अरेरे काय करतोस? ते सर्कशीतले गोड दिवस विसरलास वाटते. किती मजा करायचो आपण. तुझ्या त्या सायकलवरच्या करामती अजून आठवतात आणि तुझ्या अंगातला पोशाख सर्कशीतलाच आहे की!" पिट्टी म्हणाली.

तिचे ते बोलणे ऐकून साऱ्या माकडांना कळून चुकले की, हा खरा बजरंग नसून एक भोंदू माकड आहे. मग साऱ्या माकडांनी पिट्टूवर हल्ला



केला. शेवटी पिटूने आपल्या जातभाईंची क्षमा मागितली. त्यांना फसवल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. तो देवळातल्या खऱ्या बजरंगापुढे गेला आणि त्याच्या पायांवर डोके ठेवून म्हणाला, "बजरंगा, मी माझ्या जातभाईंना फसविले. मला क्षमा कर."

साऱ्या माकडांना आनंद झाला आणि त्यांनी एकमुखाने जयजयकार केला—

"बजरंग बली की जय! बजरंग बली की जय!!"

# ब्रह्मदेवाचा जयजयकार असो!

एकदा काय झाले, रानातल्या काही पक्ष्यांनी एक सभा भरवली. अध्यक्षस्थान श्री. पोपटराज मिठूमिया यांनी भूषविले होते. चिमणूताई, घारूताई, कावळेदादा वगैरे मंडळी सभेला हजर होती. पोपटराजांनी भाषणाला सुरुवात केली–

"मित्रहो, देवाने आम्हा साऱ्या पक्ष्यांवर मोठा अन्याय केला आहे. सगळ्या पशूंना त्याने चार पाय दिले आहेत, अन् आम्हांला मात्र दोनच पाय? का म्हणून? ब्रह्मदेवाला विचारले तर तो म्हणतो म्हणे दोन पायांऐवजी मी तुम्हांला दोन पंख दिलेत! नको आम्हांला पंख! आम्हांला चार पाय हवेत."

पोपटराजाचे ते वीरश्रीयुक्त भाषण ऐकून सगळ्या सभासदांना स्फुरण चढले. "आम्हांला चार पाय हवेत, आम्हांला चार पाय हवेत." साऱ्यांनी मिळून घोषणा केली.

इतक्यात "आम्हांला पंख हवेत" अशी मोठी गर्जना झाली. जंगल दणाणून गेले. पक्षी दचकले आणि झाडावर जाऊन बसले. पाहातात तो काय? ती होती पशूंची मिरवणूक. सगळ्यात पुढे होते गजराज. त्याच्या तोंडात एल फलक होता–

"आमच्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत. आम्हांला पंख हवेत." सिंहराज गर्जना करीत होते.

पोपटराज म्हणाले,"चला. आपण जाऊ त्यांच्याबरोबर. हे पण ब्रह्मदेवाकडे निघालेत. चला सर्वजण–"

"आम्हांला चार पाय हवेत." पक्षी ओरडले.

"आम्हांला पंख हवेत." पशूंनी घोषणा केली आणि हा संयुक्त मोर्चा ब्रह्मदेवाकडे निघाला.

स्वर्गाचे दार दिसताच हत्तीने त्याला एक धडक मारली. दार कोलमडून खाली पडले. सारी मंडळी आत शिरली. ब्रह्मदेव विश्रांती घेत पडले होते. त्यांना नवल वाटले. त्यांनी विचारले, "काय गजराज? आज इकडे कुणीकडे? कसले संकट आले की काय तुमच्यावर"

गजराज मोठ्या दिमाखात उत्तरले, "देवा, संकट कसले म्हणून काय विचारता? जगणे असह्य झाले आम्हांला. या चार पायांचा कंटाळा आलाय आता. आम्हाला पंख हवेत."

पोपटराज तेवढ्यात धिटाईने पुढे झाले आणि म्हणाले, "देवा, आमचे पंख पशूंना द्या. आम्हांला त्यांचे दोन पाय द्या. पंखांचा आम्हांला वीट आलाय नुसता!"

ब्रह्मदेव गालातल्या गालात हसले आणि म्हणाले, "एवढंच ना? ठीक. होऊन जाऊद्या तुमच्या मनासारखे."

त्यांनी असे म्हणताच काय आश्चर्य! पशूंना पंख फुटले, पण त्यांचे दोन पाय झडले. दोनच शिल्लक राहिले. आणि पक्षी चार पायांचे झाले. स्वर्गाबाहेर येताच पशूंनी उडायला सुरुवात केली व पक्षी चार पायांनी चालू लागले.


हत्तीने आपले पंख पसरले आणि तो उडू लागला. उंटही होताच बरोबर, निळ्या निळ्या आकाशातून झाडांच्या शेंडयांवरून उडताना त्या दोघांनाही मजा वाटत होती. हत्ती उंटाला म्हणाला, "मजा आहे आता आपली, नाही? मी तर आता सबंध पृथ्वीला प्रदक्षिणा घालून येईन."

उंट म्हणाला, "खरेच! पंख मिळाल्यामुळे आता चाल चाल चालावे लागणार नाही आपल्याला."

गप्पागोष्टी करीत दोघेही आकाशातून उडत असता नकळत उंटाची भली मोठी मान झाडाच्या फांदीला अडकली. ती काही केल्या सुटेना. त्याला सोडविण्याचा हत्तीने खूप प्रयत्न केला, पण त्याचे एवढे शरीर, दोन पंख किती काळ तरंगून ठेवणार? थोड्याच वेळात त्याच्या पंखातले त्राण नाहीसे झाले अन् विमानाच्या छत्रीसारखा हत्ती खाली खाली येऊन धाडकन् जमिनीवर कोसळला. बिचारा उंट वरतीच लटकत राहीला.

गजराज कसेबसे उठून समोर पहातात तो सिंहराज बसलेले! दोनच पाय असल्यामुळे त्यांना जमिनीवर धड उभेही राहाता येत नव्हते. त्याचा असा दुर्मुखलेला चेहरा कुणी कधीच पाहिला नव्हता. जंगलाच्या राजाची ती केविलवाणी अवस्था पाहून हत्तीने त्यांना विचारले, " काय सिंहराज, आज असे शांत का तुम्ही?"

सिंह गुरगुरून म्हणाला, "शांत राहू नको तर काय करू? समोर भक्ष्य दिसत असता मला ते मारता येत नाही. कारण भक्ष्याचा पाठलाग करणेच जमत नाही. मला धड ना चालता येत, ना धड उडता येत." सिंहाने चवताळून गर्जना केली, पण कुणीच घाबरले नाही. कारण पंखवाल्या सिंहाला विचारतो कोण?



चतुर कोल्होबाचीसुद्धा अशीच गत झाली. दोन पायांनी खुरडत खुरडत कसेबसे ते या मंडळीत सामील झाले आणि वैतागून म्हणाले, "छे: बुवा! विटलो या पंखांना. मला वाटले होते, आकाशातून शिकार हेरावी अन् घालावी झडप. पण कसले काय! मी खाली येईपर्यंत तो चपळचाल ससा कुठल्याकुठे पसार झाला. या पंखामुळे झुडुपातही जाता येईना मला. पोटात तर कावळे कावकाव करताहेत."

सगळ्या पशुमंडळींना पंख मागितल्याबद्दल वाईट वाटले. पक्ष्यांची अवस्थासुद्धा अशीच बिकट झाली. चिऊताई अन् कावळेदादा आपल्या चार पायांनी लुटूलुटू चालत होते. चिऊताईना चार पाय मिळाले, पण ते इवलेच होते. वीतभर अंतर कापायला दोन तास लागले तिला! अगदी काकुळतीला येऊन ती कावळ्याला म्हणाली,

"कावळेदादा, नाही रे चालवत आता! खूप थकले मी. भूकही खूप लागलीय. माझी चिमणी बाळे घरट्यात चिवचिव करीत असतील. त्यांना भरवायचंय् मला. पण जाऊ कशी आता घरट्यात? हायरे देवा! कुठून बुद्धी झाली अन् पाय मागितले!"

कावळेदादा आपला एकच डोळा मिटून म्हणाले, "होय ग चिऊताई, मलाही पश्चात्ताप होतोय आता. पंख होते तेव्हा झाडावर बसून अचूक भक्ष्य टिपायचा मी. पण आता खायला काहीच सापडत नाही."

त्या दोघांचं बोलणं संपतं न संपतं तोच पोपटराज तिथे धापा टाकीत येऊन पोचले. एक दीर्घ सुस्कारा टाकून ते म्हणाले, "हुश्श! वाचलो बुवा कसाबसा!"

त्याची ती घाबरीघुबरी अवस्था पाहून कावळेदादाने विचारले, "का हो मिठूमिया, काय झाले? एवढे जीव घेऊन पळतसे आलात?"

"जीव घेऊन पळू नको तर काय जीव देऊ?" पोपटराज म्हणाले. "बाकी जीव गेलाच होता माझा जवळजवळ. काळ आला होता पण वेळ आली नव्हती म्हणून वाचलो."

चिमणीताई म्हणाली, "अहो पण झाले तरी काय?"

पोपटराज सांगू लागले - "अग चिऊताई, माझ्या या नव्या चार पायांनी ठुमकत मुरडत मोठ्या दिमाखाने मी निघालो. एके ठिकाणी पोचलो. तिथे साऱ्या फळांनी भरलेल्या टोपल्या ठेवल्या होत्या. पेरू, केळी, द्राक्षे ! अहाहा ! त्या वासाने तोंडाला पाणी सुटले माझ्या. वाटले, या झाडावरून त्या झाडावर नाचा, फळे शोधा, त्यांना चोच मारून ती पिकलीत की नाही तेपाहा, हा खटाटोप वाचला आता. पोट भरून खाऊन घ्यावी ही आयती फळे, असा विचार करून चोच मारतोय तोच चार-पाच माणसे ओरडतच आली माझ्या अंगावर. 'चार पायांचा पोपट, चार पायांचा पोपट,' असे ओरडत ती माझ्या मागून पळू लागली. असा जीव घेऊन पळत सुटलो म्हणतेस! अशी रपेट जन्मात केली नव्हती कधी !

पोपटराजाचे बोलणे चालू असता अचानक घारूताई तिथे येऊन पोचल्या अन् म्हणाल्या, "फिटली रे बाबा, हौस फिटली चार पायांची!"

चिमणीताईने विचारले, "घारूताई, तू कुठे गेली होतीस?"

घारूताई सांगू लागली, "अग ही काय तिथे पलीकडच्या अंगणात दबा धरून बसले होते. एक कोंबडी आपली गुबगुबीत पिले घेऊन फिरत होती. तिथे धावत गेले झडप घालायला, पण कलकलाट करीत ती बेटी कोंबडी पिलांना घेऊन खुराड्यात पळाली ! थोड्या वेळाने पुन्हा बाहेर आली. पुन्हा मी झडप घातली. दहा वेळा झाले असे."

पण शेवटी पिल्लू सापडले की नाही? पोपटराजाने विचारले.

घारूताई म्हणाली; "छे: रे; कसले सापडतेय? पंख असते तर घिरट्या घालून एव्हाना दोन-तीन पिले फस्त केली असती. म्हणूनच म्हणते, चार पायांची हौस पुरती फिटली आता!"

कावळेदादा म्हणाले, "एकूण आपल्याला सर्वांनाच कंटाळा आलेला दिसतोय चार पायांचा. मग चला तर आपणसुद्धा जाऊ ब्रह्मदेवाकडे. त्याला शरण जाऊन आपले पंख पुन्हा मागून घेऊ."

अशा रीतीने संपवाले सारे पशू आणि पक्षी हवालदिल, भुकेने अर्धमेले झाले आणि मग ही सारी मंडळी पुन्हा ब्रह्मदेवाकडे निघाली.

आता कुणी ओरडत नव्हते, कुणीच गर्जना करीत नव्हते.

त्यांची ती शांततेने येणारी मिरवणूक पाहून ब्रह्मदेव पुन्हा गालातल्या गालात हसले आणि मोठ्याने म्हणाले, "का मंडळी, परत आलात इथं? आता कसलं संकट तुमच्यावर?"

गजराज खालच्या सुरात म्हणाले, "देवा, आता संकटबिंकट काही नाही. पण आम्ही तुम्हांला एक विनंती करायला आलो आहोत."

पोपटराज आपल्या मधुर वाणीने हळूच म्हणाले, "देवा, आम्हांला दुसरे काही नको. तेवढे आमचे पूर्वीचे रूप आम्हांला परत द्या."

ब्रह्मदेव खदखदून हसले. "हात्तिच्या, एवढेच ना? जा. तुम्हांला पूर्वीचे रूप प्राप्त होईल."


त्यांनी असे म्हणताच पक्ष्यांना पंख फुटले अन् पशू चार पायांचे झाले. पूर्वीचे रूप मिळाल्याचा सगळ्यांना आनंद झाला आणि मग त्यांनी एकमुखाने पुकारा केला—

'ब्रह्मदेवाचा जयजयकार असो!'

# फुलांचा झगा

आमची वासंती तशी मोठी गोड मुलगी आहे. तिचा चेहरा जसा गोड तसे बोलणेही गोड. पण ती थोडीशी नादी आहे. जे आवडेल ते हवेच, असा तिचा हट्ट असतो. त्या दिवशी असेच झाले. आपल्या दोस्ताबरोबर ती त्याच्या कॉलेजचे संमेलन पाहायला गेली होती. संमेलनात एका मुलीचा नाच झाला. त्यावेळी त्या मुलीच्या केसांवर आणि अंगावर फुलेच फुले गुंफली होती. फुलांचेच कपडे जणू तिने अंगावर घातले होते.

झाले, घरी आल्यापासून तिने आईजवळ हट्ट धरला, "मला त्या नाचणाऱ्या मुलीसारखा फुलांचा झगा हवाय." साऱ्यांनी तिला नानापरीने समजावले. पण छे: ! तिचा आपला एकच हट्ट, 'फुलांचा झगा हवा !' शेवटी आई चिडली आणि तिने वासंतीच्या पाठीत एक रट्टा घातला. हुंदके



देत देत वासंती आपल्या लाडक्या बागेत आली. तिथली फुले पाहून तिचे रडू कुठल्याकुठे पळाले. पानांशी शिवाशिवी खेळणाऱ्या वाऱ्याबरोबर वासंती खेळू लागली आणि काय आश्चर्य ! पळता पळता ती एकदम फुलांच्या देशात गेली वाऱ्याच्या झुळुकीबरोबर.

अहाहा ! आता मात्र वासंतीचा आनंद गगनात मावेना. जिकडे जावे तिकडे फुलेच फुले ! इतक्यात सुगंधाचा भपकारा आला. वासंतीने पाहिले, हिरवे, पिवळे, निळे, जांभळे पोशाख घातलेल्या छोट्या छोट्या मुली तिच्याभोवती उभ्या होत्या. त्यांचे चेहरे फुलांसारखे होते.

'कोण ग तुम्ही?' वासंतीने विचारले.

'आम्ही फुलराणीच्या मैत्रिणी.' लालजर्द परकर आणि हिरवे हिरवे पोलके घातलेल्या जास्वंदीने आपला पिवळया परागांचा शेपटा उडवीत उत्तर दिले.

'येतेस आमच्याबरोबर खेळायला?' पांढऱ्या शुभ्र पोशाखाच्या गुलछडीने लचकत मुरडत विचारले.

'हो, खरेच ! चल ना आपण लपंडाव खेळू. वारा, सूर्यकिरण, फुलपाखरे सारेजण येतील खेळायला.' नाजुकशी जुई नाजूक आवाजात म्हणाली.

'एहे ! लपंडाव कसला खेळता? आपण शिवाशिवीच खेळू.' पिवळीजर्द ऐटबाज चाफेकळी म्हणाली.

'नाहीतर काय? लपंडावापेक्षा शिवाशिवीच बरी.' एवढा वेळ अळीमिळी गुपचिळी करून बसलेली मोगरी तोऱ्यात म्हणाली.

'अशा भांडता कशाला? कधी नव्हे ते ती आज आली आहे, तिच्याशी खेळूया काहीतरी.' हसत हसत शेवंती म्हणाली.

तिचा झूल असलेला पिवळा झगा वासंतीला खूप आवडला. एवढ्यात आपल्या गुलाबी परकराचा घोळ सावरीत गुलाबाची कळी आली आणि घाईघाईने म्हणाली, 'चला चला सगळ्याजणी लवकर चला. राणीसाहेबांनी बोलावलंय.' बकुळीचे चिमुकले बोट धरून अबोलीही तिथे आली होतीच. अबोलीचे पातळ आणि अबोलीचे पोलके. नाजुकशी अबोली मोठी गोड दिसत होती. वासंतीने तिला विचारले, 'तुमच्या राणीचं नाव काय ग?'

'कमलाराणी. किती सुरेख आहे आमची राणी ! चला ग लवकर सगळ्याजणी. आज वसंतराजे येणार आहेत.' अबोली म्हणाली आणि तिने वासंतीचा हात धरला. सगळ्याजणी दरबारात जायला निघाल्या.

वासंतीला राणी पाह्यची कोणी उत्सुकता लागली होती. शेवटी त्या सगळ्याजणी दरबारात आल्या. अहाहा ! काय सुंदर देखावा होता तो ! वासंती पाहतच राहिली.

चकचकीत स्फटिकाच्या सिंहासनावर कमलाराणी बसली होती. सिंहासनावर हिरव्या गर्द मखमलीची गादी होती. आणि आश्चर्य म्हणजे ते सिंहासन पाण्यात होते. आकाशाच्या निळ्या रंगाचे प्रतिबिंब पाण्यात पडल्यामुळे पाणी निळे दिसत होते. कमलाराणी गुलाबी रंगाचे उंची गर्भरेशमी पातळ नेसली होती. खरोखरच ती अतिशय सुरेख दिसत होती.

सगळ्याजणींनी राणीला नमस्कार केला व वासंतीची राणीशी ओळख करून दिली, इतक्यात एक पांढरा शुभ्र हंस आला आणि त्याने वर्दी दिली. 'वसंत राजे येत आहेत.' सगळ्याजणींना खूप आनंद झाला. वसंतराजाचे स्वागतगीत सुरू झाले. कोकिळाताई गाऊ लागली. इतर पक्षी तिला साथ देऊ लागले. वारा बासरी वाजवू लागला. निर्झर तबला वाजवू लागला. आणि झाडांची पाने टाळ्या वाजवू लागली.

शेवटी निसर्गाच्या पालखीत बसलेले वसंतराजे आले. हिरव्या रेशिमाचे जरीकाठी धोतर ते नेसले होते. त्यांच्या गळ्यात, कानात, हातात सोनेरी किरणांचे दागिने होते. पाठीवर इंद्रधनुष्य होते. किती प्रसन्न, सुंदर दिसत होते वसंतराजे ! शेवंतीने हळूच वासंतीला विचारले,

'ती हातात काठी कसली ग? मारतात बिरतात की काय ते?'

शेवंती हसली आणि म्हणाली, 'अग वसंतराजे किती प्रेमळ आहेत ! मारत-बिरत नाहीत ते कुणाला. ती काठी किनई जादूची आहे. तिचा स्पर्श झाला की कुरूप माणूसही सुंदर होतो.'

'मग मला फुलांचा झगा देतील का ग ते?' वासंतीने विचारले.

वसंतराजांनी वासंतीचा प्रश्न ऐकला. ते म्हणाले, 'हो हो, का नाही देणार झगा? ये इथे माझ्याजवळ.' असे म्हणत त्यांनी वासंतीच्या अंगाला आपल्या जादूच्या काठीचा स्पर्श केला. तो काय आश्चर्य ! वासंतीचा झगा तर फुलांचा झालाच, पण केसात, कानात, गळ्यात, हातात फुलेच फुले दिसू लागली. वासंतीचा आनंद गगनात मावेना. आपला फुलांचा झगा आईला दाखवायला वासंती पळत निघाली.

इतक्यात 'वासंती ए वासंती' अशा आईच्या हाका तिला ऐकू आल्या. वासंतीने पाहिले. समोर आई उभी होती.

'आई बघ तरी माझा फुलांचा झगा.' ती म्हणाली. आणि पाहते तो?– अंगावर नेहमीचाच झगा !

'हात्तिच्या, ते सारे स्वप्नच होते तर !' वासंती पुटपुटली.

यावर आई नुसती हसली. वासंतीच्या गालावरचे अश्रू हळुवार हाताने तिने पुसून टाकले.

# एकदा सूर्याला पडसं झालं !

एकदा किनई काय झाले, आपले आकाशातले सूर्यदेव आहेत ना? त्यांना भयंकर पडसे झाले. नाकातून पाण्याची धार वाहायला लागली त्यांच्या ! शिंका देऊन बिचारे सूर्यनारायण टेकीला आले ! सबंध रात्रभर ब्रह्मदेव सूर्याच्या अंथरुणापाशी बसून होते. स्वर्गातल्या साऱ्या लहानमोठ्या वैद्यांना त्यांनी बोलावणे पाठवले. साऱ्यांनी आपापल्या परीने उपाय केले. कुणी काढा करून दिला. कुणी काय केले ! कुणी काय केले ! पण छे ! सूर्याच्या शिंका काही थांबेचनात. शेवटी आले धन्वंतरी. आपल्या पोतडीतली सारी औषधे काढली त्यांनी. पण अंहं ! सूर्याचे आऽछी ! आऽछी ! हे गाणे संपेना. आता काय करावं? ब्रह्मदेवापुढे प्रश्न पडला.



सूर्य जर कामावर गेला नाही तर जगाला प्रकाश कसा मिळणार? सारे जग अंधारात बुडून जाईल. अन् मग पुढे? छे: ! ब्रह्मदेवाला कल्पनाच करवेना. पण विचार करून का कुठे सूर्याचं पडसं बरं होणार होतं? एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तीन दिवस गेले. सूर्याचे आऽछी आऽछी आपले कायम!

तीन दिवस आणि तीन रात्र ब्रह्मदेव सतत सूर्याजवळ बसून होते. एवढे मोठे ब्रह्मदेव, पण त्यांना काही सुचेना ! आता आणखी एक दिवस सूर्य उगवला नाही तर सारे जग अंधारात बुडून जाईल, जगात भयंकर गोंधळ होईल या काळजीने ते बेचैन झाले. एवढ्यात 'नारायण ! नारायण !' हा ओळखीचा आवाज त्यांच्या कानी पडला व त्यापाठोपाठ नारदमुनी तिथे येऊन ठेपले. नारदांना पहाताच ब्रह्मदेवाला हायसे वाटले. कारण सूर्याच्या पडशावर त्यांच्याकडे काहीना काही उपाय सापडेल याबद्दल त्याला खात्री होती. पण नारदमुनीने सुरुवात केली तीच मुळी तणतणतच !

'अरेरे ब्रह्मदेवा, काय हा गोंधळ तुमच्या राज्यात ! नुसता हलकल्लोळ माजलाय तिथे पृथ्वीवर.'

'हलकल्लोळ अन् तो कशाबद्दल?' ब्रह्मदेव दचकून म्हणाला.

आपली शेंडी कुरवाळीत नारद म्हणाले, 'अहो, कशाबद्दल म्हणून काय विचारता? सूर्यदेवाचा पत्ता कुठाय? सूर्याचा पत्ता नाही म्हणून पृथ्वीवर काय काय अनर्थ माजले आहेत माहीत आहे? जिकडे तिकडे अंधाराचं साम्राज्य पसरलेय. तिथले सारे व्यवहार थांबलेयत् ! फुले उमलली नाहीत, पक्षी गात नाहीत, माणसाला माणूस दिसत नाही. शेते, राने यांची अशी अवस्था झालीय. आता आणखी दोन दिवस सूर्य उगवला नाही तर रोगराई सगळीकडे बोकाळेल. एवढेच नव्हे, तर सूर्याची उष्णता मिळाली नाही तर सारे प्राणी थंडीने गारठून मरतील. पण सूर्याला झालेय तरी काय?'

एवढ्यात आऽऽ छी: आऽ छी: अशा शिंका देऊन सूर्यानेच नारदाच्या प्रश्नाचे उत्तर दिले. नारदाने सूर्याकडे पाहिले, अन् त्याचा अवतार पाहून त्यांना सारी परिस्थिती कळून चुकली. कपाळाला हात लावून ब्रह्मदेव म्हणाले, 'नारदा, आता रे काय करायचं? मला तर काही समजेनासे झालेय बघ ! या सूर्याच्या शिंका तर क्षणभर देखील थांबत नाहीत.'

नारदांनी पळभर विचार केला आणि ब्रह्मदेवाला म्हणाले, 'ब्रह्मदेवा, काही चिंता करू नका. मी आत्ता पृथ्वीवर जाऊन औषध घेऊन येतो. सारे काही ठीक होईल.'

'नारायण ! नारायण !' करीत नारदमुनी निघाले औषध आणायला. प्रथम ते पृथ्वीवरच्या मुंबई या शहरात आले. मुंबई शहराची परिस्थिती त्यावेळी बिकट झाली होती. तिथे चाललेल्या काळ्या बाजाराला अंधारामुळे ऊत आला होता.

चालत चालत नारद एका थिएटरजवळ आले. दिव्यांचा नुसता लखलखाट होता तिथे. गर्दी काही विचारू नका ! त्या गर्दीतच ते हळूहळू थिएटरच्या आत शिरले. आत मिट्ट काळोख होता. पण समोरच्या पडद्यावर रंगीबेरंगी चित्रे दिसत होती. ती पाहून नारदाला गंमत वाटली. उभ्याउभ्याच ते पाहू लागले. एक माणूस शिंकत शिंकत घरात शिरला. नंतर त्याच्या बायकोने कसलासा पदार्थ त्याच्या पाठीला, डोक्याला, नाकाला चोळला आणि दुसऱ्या दिवशी गृहस्थ बरा झाला. मग त्या बाईने सगळ्या प्रेक्षकांना सांगितले 'विक्स व्हेपोरब' हे औषध म्हणजे पडशावरचा रामबाण उपाय आहे.

नारदांना पटकन् सूर्याची आठवण झाली. सूर्याच्या पडशावर हेच औषध योग्य आहे असा त्यांचा समज झाला. मग नारद थिएटरात थांबताहेत कशाला? लोकांना धक्केबुक्के देत ते धावतच बाहेर पडले.

दोन पावले चालून जातात न जातात तोच संगीताचे स्वर त्यांच्या कानी पडले. नारद म्हणजे संगीतज्ज्ञ. संगीत म्हणजे त्यांचा जीव की प्राण ! नकळत त्यांची पावले थांबली. तो काय? ॲस्प्रो ऽ ऽ ॲस्प्रो ऽ ऽ ॲस्प्रो ऽ ऽ ऽ असे गीत कुणीतरी स्त्री कर्कश आवाजात गात होती. नारदांना कळेना, हे आहे तरी काय?

समोरून जाणाऱ्या एका गृहस्थाला त्यांनी विचारले, 'काय हो, ॲस्प्रो म्हणजे काय? हा संगीताचा नवीन प्रकार आहे का?'

नारदाकडे विचित्र नजरेने पहात ते म्हणाले, 'ॲस्प्रो हे एक औषध आहे. पडसे, डोकेदुखी यावरचा तो एक उत्तम उपाय आहे.'

नारदाला पुन्हा सूर्याचे पडसे आठवले. त्यांनी घाईघाईने त्या गृहस्थांना विचारले, 'कुठेसे मिळेल हो हे औषध?'

'ते समोर दुकान दिसतेयना तिथं जा.' ते गृहस्थ म्हणाले. नारदमुनी त्या दुकानात गेले आणि त्या दुकानदाराला म्हणाले, 'अहो, आमच्या सूर्याला भयंकर पडसे झालेय म्हणून दोन दिवस उगवला नाही तो. तेव्हा तुमच्याकडे पडशावर जेवढी औषधे असतील तेवढी बांधून द्या.

दुकानदाराने सारीडॉन, ॲस्प्रो, व्हिक्स, अमृतांजन, ॲनासीन झाडून सारी औषधे बांधून दिली. औषधाचे पुडके घेऊन नारद निघाले. दुकानदाराला नवल वाटले. नारदांना अडवून तो म्हणाला, "वा ! वा ! पाहुणे पैसे दिल्यावाचून औषध घेऊन कुठे चाललात?"

'पैसे?' नारद म्हणाले. पैसे कुठचे देऊ मी?

'पैसे नसतील तर आणा औषधे इकडे,' दुकानदाराने ते पुडके हिसकावून घेतले.

काकुळतीला येऊन नारद म्हणाले, 'अहो, ही औषधे मी सूर्याकरिता स्वर्गात नेतोय. त्याचेही पैसे मागता तुम्ही? सूर्याने इतके

दिवस तुम्हाला प्रकाश फुकट दिला; उष्णता फुकट दिली; धान्य फुकट दिले. तो उगवला नाही तर जगाचे कसे होणार?' दुकानदाराला वाटले, या गृहस्थाला वेड लागलेय. तो म्हणाला, 'पाव्हणे दुसऱ्या कुणाला तरी फसवा जाऊन. मी नाही फसणार अशाने.'

झाले. निराश मनाने नारद बाहेर पडले आणि नंतर शहरातली सारी दुकाने पालथी घातली त्यांनी. पण सारे दुकानदार एकाच माळेचे मणी ! फुकट औषध द्यायला कुणीच तयार होईना. बिचारे नारदमुनी ! चालून चालून थकले. शेवटी शहराबाहेर आले. तिथे होते एक तळे. हुश्श करीत तळ्याकाठी ते बसले. शहरातल्या कुबट वातावरणातून बाहेर पडल्यामुळे त्यांना बरे वाटले. एवढ्यात सळसळ करीत वारा आला आणि त्यांना म्हणाला.

'का हो नारदमुनी, आज चिंताक्रांत का दिसता?'

कपाळावर हात मारून नारद म्हणाले, 'अरे बाबा, चिंता नको करू तर कय करू? त्या सूर्याला झालेय् पडसे. अन् त्यावर औषधच सापडत नाही बघ. स्वर्गात नाही आणि इथे मुंबईतही. आता त्याचे पडसे बरे होणार तरी कसे?'

'का इथे मुंबईत मिळाली नाहीत वाटते औषधे? गल्लोगल्ली तर आहेत दुकाने औषधांची नि दवाखाने डॉक्टरांचे.' वारा म्हणाला.

'पण या नारदाच्या बोलण्यावर विश्वास बसला पाहिजे ना यांचा.' तळ्याकाठच्या वृक्षांची पाने डोळे मिचकावीत म्हणाली. तळ्यातल्या एका बेडकाने हे संभाषण ऐकले. त्याला मोठी मजा वाटली. खुदूखुदू हसत बेडूक जवळच्याच एका माशाला म्हणाला, 'हं, म्हणे सूर्याला पडसे झालेय ! सबंध दिवसभर तर ढगात लोळत असतो नुसता. आमच्याकडे पाहा म्हणावे, आम्ही सबंध दिवस पाण्यात राहतो. आम्हांला नाही कधी होत

ते पडसे?'

फिदीफिदी हसत मगर म्हणाली, 'ढोंग आहे झाले सारे ! एवढेसे पडसे झाले, त्याला औषध कशाला?'

तळ्यात उगवलेल्या कमलिनीला मात्र बेडूक, मगर आणि मासा यांचे संभाषण आवडले नाही. सूर्यावर खूप प्रेम होते तिचे. त्याला पडसे झाल्याचे ऐकून तिला फार दुःख झाले. ती हळूच नारदमुनीजवळ आली आणि म्हणाली,

'नारदमुनी, मी तुम्हाला एक औषध देते, ते सूर्यदेवांना नेऊन द्या तुम्ही. पडशावरचा रामबाण उपाय आहे तो. एका क्षणात सूर्यदेव बरे होतील. मी नेहमी पाण्यात राहते ना? त्यामुळे पडशावरचे औषध माहीत आहे मला.' असे म्हणून कमलिनीने आपल्याजवळचे औषध पानात बांधून नारदाजवळ दिले. त्यांना खूप आनंद झाला. ते धावतच स्वर्गात आले, आणि त्यांनी ते औषध सूर्याला दिले. तर काय आश्चर्य ! सूर्याचे पडसे ताबडतोब बरे झाले !


नारद डोळे मिचकवीत सूर्याला म्हणाले, 'हे औषध कुणी दिले माहीत आहे का सूर्यदेव? तुमच्या लाडक्या कमलिनीने बरे.'

सूर्य धावतच ढगाबाहेर आला. आपल्याला पडशातून मुक्त करणारी कमलिनी त्याला पाहायची होती. सूर्य उगवताच साऱ्या जगावर लख्ख प्रकाश पडला. सगळीकडे प्रसन्नता दिसू लागली. सूर्याचे दर्शन होताच फुले फुलली. पक्षी गाऊ लागले. आणि कमलिनी? सूर्याला पाहाताच कमालीची लाजली आणि गालातल्या गालात खुदकन हसली. अजूनही सूर्य उगवला की कमलिनी अशीच लाजते, खुदकन हसते. तिच्याकडे पाहिल्यावाचून सूर्यालाही चैन पडत नाही.

# बोलाफुलाला गाठ

एकदा एका जंगलात एक मजेदार गोष्ट घडली. अतिशय घनदाट जंगल होते ते. एक भला मोठा सिंह त्या जंगलावर राज्य करीत असे. सिंह पराक्रमी, शूर असला तरी भोळाभाबडाच होता. त्याचा ज्योतिषशास्त्रावर कमालीचा विश्वास. आणि म्हणूनच ज्योतिष जाणणारा एक कोल्हा त्याने पदरी बाळगला होता. कोल्हा होता मोठा लबाड. पण सिंहाचा त्याच्यावर विश्वास होता. एक दोन वेळा कोल्ह्याने सांगितलेले भविष्य खरे ठरले होते. नाही असे नाही. तेव्हापासून सिंहाचा कोल्ह्यावर पक्का विश्वास बसला होता. भविष्य सांगण्याच्या कामगिरीबद्दल कोल्ह्याला सिंहाच्या शिकारीतला वाटा मिळे. काही कष्ट न करता खायला मिळत असल्यामुळे कोल्होबाचे दिवस मजेत चालले होते !

परंतु काही दिवसांनी कोल्होबा कंटाळले. सिंहाने खाऊन राहिलेले उरलेसुरले मास आणि हाडे खाणे कोल्ह्याला कसे परवडेल? शेवटी त्या



लबाड कोल्ह्याने एक युक्ती काढली. तो सिंहाच्या गुहेत गेला अन् एका कोपऱ्यात गप्प बसून राहिला. सिंह आपली शिकार खाण्यात गुंगून गेला होता. पोट भरल्यानंतर त्याचे कोल्ह्याकडे लक्ष गेले. तो म्हणाला,

'काय कोल्होबा, केव्हा आलात? मला हाक नाही मारलीत ती? जा, ती शिकार खाऊन घ्या' तरी कोल्हा आपला गप्प. सिंहाला वाटले, कोल्हा रागावला.

'आजची शिकार मोठी चवदार आहे. खाऊन तर पहा. तुमचा सारा राग पळून जाईल.' सिंह हसत म्हणाला.

'खरे सांगायचे म्हणजे मला आज भूकच नाही. संकटाच्या भीतीने माझी भूक-तहान-झोप सारे काही उडून गेले आहे.' कोल्हा दुःखी चेहऱ्याने म्हणाला.

'संकट? आणि ते कसले? सांगा सांगा, लवकर सांगा कोल्होबा.' सिंह घाबरतच म्हणाला.

आपला बाण अचूक लागलेला पाहून कोल्हा मनातल्या मनात खूष झाला. तरी चेहऱ्यावर दुःख दाखवीत तो म्हणाला, 'काय सांगू महाराज ! आपल्यावर एक फार मोठे संकट येणार आहे. या जंगलाला प्रचंड वणवा लागेल आणि आपण सगळेजण त्यात जळून जाऊ.'

'बापरे ! मग यावर काही उपाय नाही का कोल्होबा?' सिंह काळजीच्या सुरात म्हणाला.

'आहे. आजपासून दोन दिवसांनी हे संकट येणार आहे; तेव्हा त्याच्या अगोदर सगळ्यांनी हे जंगल सोडून जायला पाहिजे--' कोल्हा म्हणाला.

‘ठीक आहे. जा सार्‍या जनावरांना बोलावून आणा.’ सिंहाने आज्ञा केली.

हरीण, ससा, वाघ, अस्वल, लांडगा, माकड वगैरे जंगलातले सगळे प्राणी सिंहाच्या गुहेसमोर जमले. सिंहाने गंभीरपणे संकटाची बातमी सगळ्यांना सांगितली व तो म्हणाला, ‘आत्ताच्या आत्ता आपण जंगल सोडून गेलो तरच आपला जीव वाचू शकेल.’

हरीण म्हणाले, ‘आपण जंगलाबाहेर गेलो तर आयतेच शिकार्‍यांच्या हाती सापडू. शिवाय जीव वाचविण्याकरिता पळायलाही जागा नाही.’

सगळी जनावरे आपापसांत कुजबुजू लागली. परंतु जिवाच्या भीतीने शेवटी सगळेजण जंगल सोडून जायला तयार झाले. शेवटी ही मंडळी एकदाची जंगलाबाहेर आली. तिथे एक पडके देऊळ होते. रात्र पडली. सगळी जनावरे तेथे झोपी गेली. दुसरा दिवस उजाडला. पहातात तो मंडळीतले दोन ससे गायब झालेले. सगळेजण एकमेकाला विचारू लागले. पण सशांचा कुणालाच पत्ता नव्हता. वाघाने मात्र कोल्होबाची लबाडी ओळखली; कारण कोल्होबाच्या तोंडाला रक्ताचा वास येत होता. वाघ काहीच बोलला नाही. त्याने कोल्ह्यावर पाळत ठेवायचे ठरवले. तो सबंध दिवस सगळी जनावरे गुपचूप देवळात बसून राहिली होती. रात्र झाली. सगळी जनावरे झोपली. वाघ आपला जागाच होता. इतक्यात देवळाच्या मागच्या झाडीत कसला तरी आवाज झाला. वाघाने सभोवती पाहिले. सगळी जनावरे झोपली होती. कोल्ह्याचा मात्र तिथे पत्ता नव्हता. मग मात्र वाघाने कान टवकारले. कोल्हा बोलत होता–‘मित्रहो, मेजवानीवर भरपूर ताव मारून घ्या.’

दुसरा कोल्हा–‘पण जंबुकराजा, समजा उद्या कुणाच्या लक्षात आले की आपण त्याचीच शिकार करतो आहोत तर?’

तिसरा कोल्हा—'आणि तुम्ही या सगळ्यांना खोटे भविष्य सांगितलेत. समजा उद्या वणवा लागला नाही तर!

पहिला कोल्हा—'दोस्तहो, मी सगळा विचार केला आहे. ही भोळी जनावरे माझ्या बोलण्याने फसली. उद्या इथे थांबतेय कोण? चला आता स्वस्थ झोपूया.' हलक्या पावलाने कोल्हा आणि त्याचे साथीदार देवळात आले आणि इतर जनावरांमध्ये मिसळून झोपी गेले. वाघाने सारे संभाषण ऐकले होते.

दुसरा दिवस उजाडला. कोल्ह्याचे लक्ष नाही हे पाहून त्याने सिंहाला सारी हकीकत सांगितली आणि मग सगळ्या जनावरांना कोल्ह्याची लबाडी कळली. मग काय विचारता? सगळ्यांनी मिळून कोल्हा व त्याचे साथीदार यांच्यावर हल्ला केला. दोन दिवस सगळ्यांना उपवास घडला होता. त्यामुळे सगळेजण शिकारीवर तुटून पडले. लबाड कोल्ह्याचा फडशा उडाला आणि मग सगळी जनावरे पुन्हा जंगलात परतली. आता वणवा लागणार नाही. आपल्यावरचे संकट टळले या आनंदात सगळेजण गुंग होते.

त्यानंतर दोनतीन दिवस उलटले. संकटाचा विचार सगळेजण विसरूनही गेले होते; आणि चौथ्या दिवशी रात्री अचानक कडाड्कड् असा आवाज झाला. सिंह खडबडून जागा झाला. पहातो तो जिकडे तिकडे आगच आग. जंगलाला वणवा लागला होता. सगळी जनावरे जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळू लागली. त्यातली किती जनावरे वाचली आणि किती मेली ते कुणास ठाऊक! मुलांनो, तुम्हांला वाटत असेल कोल्ह्याचे भविष्य खरे ठरले, होय ना? सगळ्या जनावरांनाही तसेच वाटत असेल. पण हे खोटे आहे. ते भविष्य वगैरे काही नव्हते. कोल्ह्याचे शब्द दुर्दैवाने खरे ठरले होते. याला म्हणतात बोलाफुलाला गाठ!

BVBK-0402800